वर्ष २० वे

अंक १ ला

**समाधान ही अंतःकरणाची सर्वांत सुंदर संपत्ती आहे.**
**ज्याला ही संपत्ती मिळाली, तो जगात सर्वांत सुखी मनुष्य आहे.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)
Website : http://www.parnermitramandalpune.com/

यांचे मुखपत्र

# संवाद

### वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- **वाय-फाय सुविधा उपलब्ध.**
- **विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका.**
- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले व पार्किंग).
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०′ x १४′
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०१९**
**जाने.-फेब्रु.-मार्च २०२०**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकता?

- **रु. दहा लक्ष** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- **रु. एक लक्ष** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- **रु. ११०००** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

प्रिय सभासद बंधु व भगिनींनो,

# संपादकीय

या वर्षीचा विद्यार्थी गुणगौरव, ग्रामस्थ गौरव कार्यक्रम व स्नेहमेळावा दि.२५.०८.२०१९ रोजी शिवाजीनगर येथील सभागृहात पार पडला. या कार्यक्रमासाठी **महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण परिषदेचे सह संचालक श्री.अनिल गुंजाळ, सहकारी खात्याचे माजी अपर निबंधक श्री.मनोहर त्रिभुवन व उत्पादन शुल्क विभागाचे माजी सहआयुक्त श्री.कृष्णराव शेलार** हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. झालेल्या कार्यक्रमाचा वृतांत श्री.भाऊसाहेब नरड यांनी या अंकात दिला आहे.

गेल्या चार महिन्यात बऱ्याच घडामोडी घडल्या आहेत. याही वर्षी दुष्काळ पडेल असे वाटत असताना परतीच्या मोसमी पावसाने हात दिला आणि कान्हुर पठार परिसर सोडला तर सर्व तालुक्यात ओढे नाले वाहिले व विहीरीही भरल्या. त्यामुळे सर्व तालुक्यात समाधानाचे वारे वाहताहेत.

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये **अहमदनगर लोकसभा मतदार संघातून डॉ.सुजय विखे यांची खासदार म्हणून निवड झाली.** त्यांचे पारनेर तालुका मित्र मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन! त्याचप्रमाणे दिवाळीच्या अगोदर महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका पार पडल्या. **आपल्या पारनेर तालुक्यातून आमदार म्हणून श्री.निलेश लंके हे निवडून आले. श्री. लंके यांचे पारनेर तालुका मित्र मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन!** या निमित्ताने पुणेस्थित पारनेरकरांकडून श्री.लंके यांना शुभेच्छा देतो! श्री.लंके यांच्याकडूनही तालुक्याच्या प्रगतिसाठी पूर्ण योगदान भेटावे, ही अपेक्षा!!

मी दरवेळी 'संवाद' मध्ये 'कर्तृत्व पारनेरकरांचे' या सदरासाठी आपल्या तालुक्यातील कर्तृत्ववान व्यक्तीवर लेख पाठवावेत असे आवाहन करीत असतो. त्यास आपण प्रतिसाद द्याल अशी अपेक्षा आहे. आपल्या तालुक्यातील **सनदी लेखापाल डॉ.शिवाजीराव झावरे सर तसेच इंजि.बाळासाहेब शिंदे यांची उच्चस्तरावर नेमणूक झाल्याबद्दल आपण सर्वांनी नोंद घेणे आवश्यक आहे. त्यांचे अभिनंदन व त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा!**

आपल्या मंडळाचे सचिव श्री.सुनिल पोटे यांनी पारनेर तालुक्यात **'फिरती विज्ञान प्रयोगशाळा'** हा शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त असलेला उपक्रम दि.१७ ते २० सप्टेंबर २०१९ दरम्यान आपले मित्र मंडळ व विज्ञान वाहिनी संस्था, पुणे यांच्या सयुंक्त विद्यमाने यशस्वीपणे राबिविला. त्यांचे अभिनंदन तसेच धन्यवादही! अशा प्रकारचे वेगवेगळे उपक्रम मंडळाच्या कार्यकारीणी सदस्यांद्वारे राबविले जातात, असे मला अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

आपणास आता महिला वसतिगृह उभारणीचे काम करावयाचे आहे; या ध्येयाची आठवण करून या संपादकीयास अर्धविराम देतो!

**जय जिजाऊ । जय शिवराय ।।**

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## सभासद, हितचिंतक व देणगीदार यांना
# नववर्ष २०२०
## सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो ही शुभेच्छा !

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ |
| श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| श्री.विलास ठुबे | सदस्य | ९४२३४६५९८४ |
| श्री.किरण तिकोणे | सदस्य | ९८२२३४६१३८ |

# वसतिगृह प्रवेश

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, गल्ली नं. ८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे असून प्रवेशासाठी संपर्क साधावा.**

**व्यवस्थापक - श्री.संजय जंगम - मो. ९४२३०२२१२३, ९९२१८५३३२३ (वेळ दु. ३ ते ८)**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

पारनेर तालुका मित्र मंडळाचा वार्षिक स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२५.०८.२०१९ रोजी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन, शिवाजीनगर, पुणे ४११००५ येथे सकाळी १० ते २ या वेळेत संपन्न झाला. केवळ महाराष्ट्र राज्याचेच नव्हे तर अखील भारताचे दैवत असलेले श्रीमानयोगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तमसोमांज्योतिर्गमय चे प्रतीक असलेल्या दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरूवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा. श्री. अनिल गुंजाळ** व प्रमुख पाहुणे **मा.श्री. मनोहर त्रिभुवन, मा. श्री. कृष्णराव शेलार,** मंडळाचे अध्यक्ष **मा.श्री. हौसाराम घोडके,** उपाध्यक्ष **श्री.मधुकर शिरोळे,** सचिव **श्री. सुनील पोटे सर,** कार्यवाहक **श्री.बाजीराव जगदाळे** आणि मंडळाचे सर्व कार्यकारीणी सदस्य यावेळी व्यासपिठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा.श्री.अनिल गुंजाळ** साहेब यांचा सत्कार **डॉ.बाळासाहेब बांडे** यांनी केला आणि परिचय **प्रा.सुनील राजेनिंबाळकर** यांनी करून दिला. प्रमुख पाहुणे **मा.श्री.मनोहर त्रिभुवन, मा.श्री.कृष्णराव शेलार** यांचा सत्कार **श्री.अशोक वाबळे व श्री.मधुकर शिरोळे** यांनी केला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय **इंजि.विजयकुमार ठुबे** यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना **प्रा. सुनील राजेनिंबाळकर** यांनी व्यासपीठावरील मान्यवरांना वंदन करून आणि सर्व उपस्थितांचे स्वागत करून मंडळाच्या



*छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिमा पुजन झाल्यानंतर दिप प्रज्वलन करताना कार्यक्रमाचे मान्यवर व उपस्थित मंडळाचे सदस्य*

कामाचे अत्यंत तडफदार वाणीने आणि अलंकारिक भाषाशैलीत स्थापनेपासून आजअखेर पर्यंतचा चलत् चित्रपटच उलगडून दाखविला. या प्रसंगी त्यांनी मंडळाचे माजी अध्यक्ष **कै.भोंग गुरूजी** यांचा आर्जवून उल्लेख केला. दानशूर व्यक्तींच्या देणग्यांमधून व हितचिंतकांच्या आशिर्वादातून **'पारनेर भवन'** ही देखणी वास्तू वसतिगृहाच्या रूपाने सुरू असल्याचा सार्थ अभिमान बोलून दाखविला. शब्दसुमनांनी गुंफलेल्या पारनेर तालुक्यातील **संतश्रेष्ठ निळोबाराय, थोर क्रांतीकारक सेनापती बापट आणि पद्मविभूषण मा.अण्णासाहेब हजारे** यांच्या कार्याचा गौरव केला.

प्रमुख पाहुणे **मा.मनोहर त्रिभूवन,** माजी अप्पर निबंधक, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या भाषणातून **इंजी.विजयकुमार ठुबे** यांच्याशी असलेल्या मैत्रीचा खास उल्लेख केला. पारनेर तालुका काय आहे? या प्रश्नाचे उत्तर मा.अण्णासाहेब हजारे यांच्यासारखे थोर देशभक्त तेथे




स्नेहमेळाव्या प्रसंगी मार्गदर्शन करताना १) मा.अनिल गुंजाळ, २) मा.कृष्णराव शेलार, ३) मा.मनोहर त्रिभुवन, ४) इंजि.विजयकुमार ठुबे, ५) मा.गोरक्ष जगताप



*कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.अनिल गुंजाळ साहेब यांचा सत्कार करताना मंडळाचे डॉ.बाळासाहेब बांडे*



*कु.प्रतिक्षा गागरे सनदी लेखापाल परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचा पालकांसह सत्कार करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.अनिल गुंजाळ साहेब.*

आहेत असा आर्जवून उल्लेख केला. वसतिगृह उभारण्याच्या कामी सर्वांनी आत्यंतिक तळमळीने काम केले आहे असे सार्थ शब्दात उद्‌गार काढले. ''प्रत्येकाने मनापासून काम केले, स्वतःला झोकून दिले तर यश निश्चितपणे मिळते'' असे सांगितले. 'वाचाल तर वाचाल' यासाठी आपण सर्वांनी पुस्तक मैत्री करावी. मंडळाने आदर्शवत काम करीत राहावे व चांगल्या कामातून मानसिक समाधान मिळते असे त्यांनी नमूद केले. मंडळाच्या भावी काळात सुरू होणाऱ्या अभ्यासिकेसाठी लागणारी पुस्तके देण्याचा मनोदय व्यक्त केला.

दुसरे प्रमुख पाहुणे **मा.कृष्णराव शेलार,** माजी सह आयुक्त, उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी एका चांगल्या कार्यक्रमात सहभागी होता आल्याचे समाधान व्यक्त केले. मंडळाचे काम अत्यंत पवित्र आहे. त्यातूनच विद्यार्थ्यांना भावी जीवनातील एक नवी दिशा मिळेल. आमच्या काळातील चांगल्या मित्रांच्या मदतीने अभ्यासाची आवड निर्माण होऊन जीवनात उच्च पदापर्यंत पोहचता आले. असे सांगून विद्यार्थ्यांना चांगल्या मित्रांच्या सहवासात वेळ घालविण्याचे आवाहन केले. अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून वर्षातून एकदा का होईना आपल्या तालुक्याच्या विकासाबाबत एकत्र येऊन कृतीशील विचारांची देवाण घेवाण करता हे बहुमोल योगदान आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा.अनिल गुंजाळ,** सहसंचालक, परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, आपल्या अहमदनगर जिल्ह्याचा व पारनेर तालुक्याचाही विस्ताराच्या दृष्टिकोनातून पहिला क्रमांक लागतो. दुष्काळ जणू एखाद्या दागिन्याप्रमाणे शोभून दिसतो या पहिल्याच वाक्याला प्रेक्षकातून प्रचंड टाळ्यांची साथ मिळाली. संत बहिणाबाईंच्या ज्ञानदेवे रचिला पाया। उभारीले देवालया।। नामा तयाचा किंकर। ज्याने केला हा विस्तार।। जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।। तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।। बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपण केले ओजा।। या अभंगाच्या ओळी उद्‌धृत करून भजन करा सावकाश। तुका झालासे कळस।। असे म्हणत पारनेर तालुका मित्र मंडळाचे अध्यक्ष **मा.हौसाराम घोडके अण्णा** यांचा संत तुकाराम अशा सार्थ शब्दात गौरव केला. श्रीगोंद्याचे संत शेख महंमद यांच्या ऐसे केले या गोपाळे। नाही सोहळे ओवळे।। काटे केतकीच्या झाडा। आत जन्मला केवडा।। अशा प्रकारच्या अभंगातून खूपच छान काम चाललेले आहे असे सुतोवाच केले.

'जुन्या काळात पालकांना चिंता नसायची. आताचे पालक खूपच टेन्शनमध्ये असल्याचे दिसतात. पालकांनो, तुम्ही खूप ताण घेऊ नका. आताची मुले खूप हुशार आहेत. त्यासाठी त्यांना जे करायचे आहे ते करूद्या. फोन फक्त घेणे अथवा करणे याशिवाय अनेक पालकांना इतर फंक्शनसाठी नातवांचीच मदत घ्यावी लागते ना! **खूप काम करा, माणुसकी जपा, भ्रष्टाचार करू नका, अंधश्रद्धा बाळगू नका, जातीयता मानू नका, व्यसनाधीन बनू नका व आत्महत्या टाळा. अशी सप्तसूत्री त्यांनी सांगितली.** काय **लागतय जगायला, माझं कुणीतरी वाट पाहतयं ना?** हे एक खास शैलीतील पद्य त्यांनी गाऊन दाखविले. सध्याच्या स्त्रियांच्या पुरूषी थाटात राहण्यामुळे मुला-मुलींमधील फरक लक्षातच येत नाही. असे काही दृश्य या सभागृहात दिसून येत नाही हे चांगले वातावरण आहे. विद्यार्थ्यांनी शारीरिक आरोग्य जपावे, हॉस्पिटलला भेट द्यावी, तेथील हृदयावरील शस्त्रक्रिया पाहावी, स्मशानातील अंतिम टप्पा पाहून त्यातून योग्य तो जीवनमार्ग सुधारावा. बोर्डाचा निकाल १०० टक्के लागावा आणि जुलैमध्ये फेरपरिक्षा रद्द



उपस्थित सदस्य व हितचिंतक

झाली तर मला मनापासून आनंद वाटेल. **सूर जुळले त्याने गाणे गावे। बाग लावली त्याने फुले द्यावीत।।** कुणासाठी काहीतरी करावे असे वाटले पाहिजे. फार चिंता न करता जीवन आनंदाने जगावे. **तरूणांनी दूरदेशी जाण्याऐवजी येथेच काम करावे.**' अशा प्रकारे अत्यंत उत्कृष्ट वक्तृत्वशैलीतून मार्गदर्शन केले. अभंगावाणीपासून ते अगदी शेरशायरी पर्यंतच्या भाषणात सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

या प्रसंगी सभासदांपैकी उद्योगपती **श्री.नानासाहेब खोडदे** यांनी किन्ही गावाला आम्ही आदर्श गावचा दर्जा मिळवून देण्यासाठी कटीबद्ध आहोत असे ठासून सांगितले. अनेक इंजिनियर अथवा सुशिक्षित बेरोजगारांना कामासाठी संधी मिळवून देणार आहोत. याशिवाय **श्री.रामदास आंधळे** यांनी कर्जुले हरेश्वर येथील पाणी फौंडेशनच्या माध्यमातून गावच्या सुधारणेसाठी काम हाती घेतल्याचे सांगितले. गावा संदर्भातील आपली सद्भावना व्यक्त करून दोघांनीही सकारात्मक विचार व्यक्त केले. सतत यश मिळवीत राहावे, पुढे टाकलेले पाऊल मागे घेऊ नये असा हितोपदेश त्यांनी केला.

**मा.अनिल गुंजाळ** साहेब यांचे शुभहस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ग्रामस्थांचा व उल्लेखनीय शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या यादीचे वाचन **प्रा.माधवराव गायके** यांनी केले. इ.१० वी व १२वीच्या विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन **प्रा.गोरक्ष जगताप** यांनी केले. प्रमुख पाहुणे **मा.कृष्णराव शेलार व मा.मनोहर त्रिभूवन, मा.रामदासजी शिर्के, मा.सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, मा.बाजीराव जगदाळे, मा.सुनील कोल्हे, मा.मुरलीधर चौधरी, मा.सुनील पोटे, मा.बाळासाहेब येणारे व मधुकर शिरोळे** आदी मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. अशा प्रकारे या वर्षीचा स्नेहमेळावा, विद्यार्थी ग्रामस्थ गौरव सोहळा आनंददायी वातावरणात मोठ्या थाटात पार पडला.

कार्यक्रमानंतर मंडळाची सर्वसाधारण सभा पार पडली. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **श्री.भाऊसाहेब नरड सर** यांनी केले. याशिवाय सर्वांचे शेवटी आभार प्रदर्शनही त्यांनी कुशलतापूर्वक पार पाडले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमानंतर मंडळातर्फे आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला. **शब्दांकन – श्री.भाऊसाहेब नरड**








# आपण असे केले तर

❇ **श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०१९ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे **प्रा. जगन्नाथ तुकाराम देंडगे**, रा. गांजीभोयरे व **श्री. नामदेव मारुती साबळे**, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास अनुक्रमे **रु.१०००/- व रू.१,५००/-** देणगी दिली.

❇ **श्री.रमेश राजाराम महाजन**, रा.पारनेर यांनी पिताश्री **कै.राजाराम शंकर महाजन (मृत्यू १९६९)** व मातोश्री **कै.इंदिरा राजाराम महाजन** यांच्या स्मरणार्थ **रु.५०००/-** देणगी दिली.



❇ **कै. सदाशिव किसन शिंदे व कै. श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे आडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.प्रविण** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❇ **कै. दत्तात्रय नाना खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि. २०.०२.२०२० च्या व **कै. भामाबाई दत्तात्रय खोसे** यांच्या दि.१९.०९.२०१९ च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.गणेश** यांनी मंडळास **रु.११२५/-** देणगी दिली.



❇ **कै.प्रा. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** रा. पारनेर यांच्या दिनांक २३.१०.२०१९ च्या स्मृतीनिमित्त त्यांच्या पत्नी **श्रीमती मृदुला** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❇ **कै. कृष्णाबाई सुखदेव पोटे**, रा. बाभुळवाडे यांच्या दि.२८.०७.२०१९ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.कुंडलीक सर** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❇ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे**, रा. कान्हुरपठार यांनी त्यांचे सुपुत्र **चि. श्रेयस** याच्या दिनांक २९.११.२०१९ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **कै. विष्णुपंत बापुराव कुलकर्णी**, रा.बाभुळवाडे यांच्या दिनांक ०२.०९.२०१९ च्या स्मृतीनिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.संतोष** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❇ **श्रीमती शुभांगी सुधाकर कावरे**, रा.सिद्धेश्वरवाडी यांनी त्यांच्या सासू **कै.सुशिला शांताराम कावरे** यांच्या दि.०८.१०.२०१९ च्या प्रथम स्मृतीदिना निमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❇ **श्री.गंगाधर भिवा कोठावळे**, रा.सांगवी सुर्या यांनी **पिताश्री कै. भिवा शिवराम कोठावळे** यांच्या दि. १७.१०.२०१९ **व आई कै.सोनाबाई** यांच्या दि. ०३.०८.२०१९ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❇ **श्री.प्रमोद दत्तात्रय काळे**, रा.शहाजापूर यांनी त्यांच्या दि.०१.११.२०१९ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❇ **डॉ. सुधाकर रामचंद्र खराडे**, रा. निघोज यांनी त्यांच्या दि. ३१.१०.२०१९ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❇ **ॲड.पद्माकर मार्तंड पोळ**, रा.पारनेर यांनी त्यांचे पिताश्री **कै.ॲड.मार्तंड मल्हार पोळ** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.



❇ **कै.सौ. सुशिला मारूती पोटघन**, रा. जातेगाव यांच्या दि.१७.०८.२०१९ रोजीच्या १०व्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **अविनाश** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❇ **श्री. राजेंद्र खंडू थोरात**, रा. पाडळी आळे यांनी त्यांचे पिताश्री **कै.खंडू गेणू थोरात** यांच्या दि. ११.११.२०१९ चे स्मृतीदिना निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **श्री.अशोक विश्वनाथ वाबळे** यांनी त्यांचे पिताश्री **कै.विश्वनाथ काशिनाथ वाबळे** यांच्या दि.१०.१०.२०१९ च्या स्मृतीप्रित्यर्थ मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **रामा एरंडे व परिवार** रा.वडझिरे यांच्यातर्फे **कै.नारायण बबनराव एरंडे** यांच्या दि.२३.०८.२०१९ च्या तृतीय स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०१९ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **श्री.अनिकेत** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❇ **श्री. निवृत्ती उर्फ पोपटराव भिकाजी वाघुंडे**, रा.कान्हुर पठार यांनी त्यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

# अभिनंदन



❊ **श्री. शिवाजीराव भिकाजी झावरे,** (सनदी लेखापाल) रा.गारगुंडी हे **एशियन ओशियन स्टँडर्ड सेटर्स ग्रुप** या संस्थेचे २०१७ ते २०१९ पर्यंत **व्हाईस चेअरमन होते. दि.१२.११.२०१९** रोजी त्यांची सदर संस्थेच्या **चेअरमनपदी २०१९ ते २०२१ पर्यंत एकमताने निवड झाली.** या वर्षीच दि.२६.०३.२०१९ रोजी त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे **'ईमरजन्स ऑफ स्टँडर्डायझेशन ऑफ अकौंटींग प्रॅक्टीसेस इन ॲग्रीकल्चर सेक्शन इन इंडिया'** या विषयावर **पी.एच.डी.** प्रदान करण्यात आली.



❊ **श्री.बाळासाहेब गोविंदराव शिंदे,** रा. पिंपरी पठार यांना संरक्षण मंत्रालयाच्या **डायरेक्टरेट जनरल ऑफ क्वालिटी अॅश्युरन्स** मधील प्रभारी उपमहानिदेशक या पदावरून त्यांना **उपमहानिदेशक** या पदावर पदोन्नती मिळाली. सदर पद हे केंद्र सरकारच्या सचिव पदाच्या सम पातळीवर आहे.

❊ पारनेर तालुका मित्र मंडळाचे कार्यकारीणी सदस्य **प्रा.सुनील रंगनाथ राजेनिंबाळकर,** रा.गांजीभोयरे हे कनीष्ठ महाविद्यालय वरवंड ता.दौंड, जिल्हा पुणे येथे कार्यरत असून त्यांची पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक संघटनेच्या **सहसचिव पदी** एकमताने निवड झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.





❊ **कु.प्रतिक्षा किसनराव गागरे,** रा.टाकळी ढोकेश्वर ही विद्यार्थीनी पहिल्याच प्रयत्नात **सनदी लेखापालची (सी.ए.)** अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाली.



❊ **ॲड. अतुल रामचंद्र अडसरे,** रा.पिंपरी जलसेन यांची पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनच्या २०१९ ते २०२० या कालावधीसाठी उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. निलेश ज्ञानदेव लंके,** रा. हंगे यांची २०१९ ते २०२४ या कालावधीसाठी **पारनेर-नगर विधानसभा मतदार संघातून आमदार पदी** निवड झाली. त्यांच्या भावी कारकिर्दीस पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे तर्फे हार्दिक शुभेच्छा!

❊ **सौ.कुमुदिनी दिनकर घोडके,** रा.कान्हुर पठार यांची पिंपरी चिंचवड सेवा निवृत्त सेवक परिषदेच्या महिला अध्यक्षपदी निवड झाली.



❊ **कु.गणेश विलास ठुबे,** रा.कान्हुर पठार याने बी.आर्च. परीक्षेत फर्स्ट क्लास मिळविला असून त्याची एम.एस. करण्याकरीता लंडन येथील नामांकीत संस्थेत निवड झाली आहे.



❊ **कु.सिद्धी श्रीकांत मातेरे** रा.बाभुळवाडे हिला मार्च २०१९ मध्ये झालेल्या **दहावीच्या परीक्षेत** ९५% गुण प्राप्त झाले.



❊ **कुमार अथर्व शंकर शिंदे,** रा.रेनवडी यास मार्च २०१९ मध्ये झालेल्या **दहावीच्या परीक्षेत** ७२% गुण प्राप्त झाले.



❊ **संकेत सुभाष कावरे,** रा. बुगेवाडी, बी.ई. (कॉम्प्युटर) असून त्याची **एम.एस.** करण्याकरीता अमेरिकेतील **कॅलिफोर्नीया युनिव्हरसिटीत** निवड झाली.



❊ **ओंकार दत्तात्रय बांडे,** रा.टाकळी ढोकेश्वर **बी.ई. सिव्हील** प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाला. त्याने कॉलेजमध्ये राज्यस्तरीय स्पर्धेसाठी 'विभव' या वार्षिक अंकाचा प्रमुख म्हणून काम केले.



❊ **कु.प्राजक्ता एकनाथ झावरे,** रा. गारगुंडी ही विद्यार्थीनी विशेष प्राविण्यासह **बी.कॉम.** ७०.२% मार्कस् मिळवून उत्तीर्ण झाली.



❊ **सौरभ संजय झावरे,** रा.गारगुंडी हा बी.टेक. (मेकॅनीकल एनर्जी) मध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाला.

## सेवानिवृत्ती



* **श्री.रामभाऊ सखाराम गुंड,** रा.वडगाव गुंड, हे थायसेन क्रुप या कंपनीतून ३८ वर्षांच्या सेवेनंतर **दि. ०१.०६.२०१९** रोजी जनरल मॅनेजर या पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **सौ.निर्मला दत्तात्रय पठारे,** रा. वाळवणे या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळामधील माध्यमिक हायस्कूल, तुकाराम नगर, पिंपरी येथे कार्यरत होत्या. ३८ वर्षांच्या सेवेनंतर त्या दिनांक **३०.०६.२०१९** रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



* **श्री. दशरथ कृष्णाजी पानमंद,** रा.कासारे हे आदिवासी विभाग महाराष्ट्र राज्य येथे कार्यरत होते. २५ वर्षांच्या सेवेनंतर सहआयुक्त या पदावरून दिनांक **३१.१०.२०१९** रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.

## नांदा सौख्य भरे

* श्री.बाळासाहेब कोंडीबा कारखिले, रा.राळेगण थेरपाळ यांचे सुपुत्र **चि.अमोल** व कै.नामदेव मारुती जाधव, रा.नारायण गव्हाण यांची सुकन्या **सौ.ऋतुजा उर्फ चंद्रकला** यांचा शुभविवाह **दि.०८.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त चि.अमोल यांचे बंधु **श्री.संदिप शिवाजीराव कारखिले** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.देवराम काळुजी इघे, रा.टाकळी ढोकेश्वर यांचे सुपुत्र **चि.सुशीलकुमार** व श्री.बाळासाहेब शंकरराव लोखंडे, रा.टाकळी भान, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांची सुकन्या **सौ.कृष्णा** यांचा शुभविवाह **दि.२०.११.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.देवराम इघे** यांनी मंडळास **रू.२००१/-** देणगी दिली.
* श्री.भास्करराव विठ्ठलराव घोडके, रा.पारनेर यांची सुकन्या **सौ.सोनाली** व श्री.विलास पांडुरंग मोरे, रा.पुणे यांचे सुपुत्र **चि.ओंकार** यांचा शुभविवाह **दि.२४.११.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.भास्करराव घोडके** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.
* श्री.रविंद्र कटारिया, रा.तिखोल यांचे सुपुत्र **चि.शुभम** व श्री.नंदलालजी मुनोत, यांची सुकन्या **सौ.पायल** यांचा शुभविवाह **दि.२८.११.२०१९** रोजी संपन्न झाला.

## निधन वार्ता




* **प्रभाकर धोंडीभाऊ मोढवे,** वय ७३ वर्षे,रा.पारनेर यांचे दि.०९.०२.२०१९ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या कन्या **सौ.माया अनिल ठुबे,** रा.कान्हुर पठार यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.



* **चंद्रभागा भागुजी पवार,** वय ९५ वर्षे, रा.वाळवणे यांचे दि.०५.०९.२०१९ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.भाऊसाहेब पवार** यांनी मंडळास **रू.११००/-** देणगी दिली.



* **मारुती महादू जपे,** वय ९५ वर्षे, रा.विरोली यांचे दि.११.०९.२०१९ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री. मारुती जपे** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **ठकाराम रामभाऊ चत्तर,** वय ७५ वर्षे, रा. सिद्धेश्वरवाडी यांचे दि. २४.११.२०१९ रोजी निधन झाले.



* **प्रकाश सदाशिव ठुबे,** वय ६१ वर्षे, रा. कान्हुर पठार यांचे दि.१९.०९.२०१९ रोजी निधन झाले.



त्यांच्या पत्नी **सुरेखा प्रकाश ठुबे,** वय ५३ वर्षे, यांचे दि.०४.१०.२०१९ रोजी निधन झाले.



* **सौ.येणूबाई उर्फ लक्ष्मीबाई सोनाजी शिर्के,** वय ९० वर्षे, रा.कर्जुले हरेश्वर यांचे दि.१५.१०.२०१९ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री. रामदास शिर्के** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



* **आनंदराव भाऊसाहेब घावटे,** वय ६६ वर्षे, रा.राळेगण थेरपाळ यांचे दि.२८.१०.२०१९ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ बंधु **श्री. रामदास** यांनी मंडळास **रू.११११११/-** देणगी दिली.

# आपण असे केले तर



कै.गुलाबराव मातेरे

**श्रीमती पुष्पाताई गुलाबराव मातेरे,** रा. बाभुळवाडे यांनी त्यांचे पती **कै.गुलाबराव महादेव मातेरे** यांचे स्मृतीप्रित्यर्थ्य मंडळास **रू.१,००,०००/–** देणगी दिली. त्यांची आतापर्यंतची एकूण देणगी **रू.२,६०,०००/–** झाली आहे.



श्रीमती पुष्पाताई मातेरे



*श्री.धोंडीबा गणपत गायखे यांनी मंडळास रू.१ लक्ष देणगी दिल्या बद्दल त्यांचा सत्कार करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.गुंजाळ साहेब*




*श्रीमती पुष्पाताई गुलाबराव मातेरे यांनी मंडळास रू.१ लक्ष देणगी दिल्या बद्दल त्यांच्यातर्फे सुपुत्र श्री.श्रीकांत मातेरे यांचा सत्कार करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.अनिल गुंजाळ साहेब.*

Nath ELEVATORS


# नाथ एलिव्हेटर्स

इमारतींच्या लिफ्टचे मॅन्युफॅक्चरर्स

- **Manufacturer of Elevators,**
- **Installation Commissioning &**
- **Maintenance of all type of Lifts.**

Prop. : Y.D.Bhusare Patil
Cell : 9890909945
9552528284

S.No.4/1+2, Narsiha Colony, Next to Balaji Law College, Thathwade, Pune - 411033.
Tel. : (O) 020-65104322  E-mail : nath.elevatorspune@gmail.com



मराठा समाजासाठी अग्रणी विवाह संस्था

# बढे मराठा वधू-वर सूचक केंद्र



**संचालक : प्रा.रावसाहेब बढे** (M.A., B.Ed.)

मोबाईल - ९७६२०४३६१६, ९६०४१३१०३२

विश्वनाथ हौ.सो.बिल्डींग नं.६०/८, दत्त मंदिराजवळ, से.२८, गंगानगर, आकुर्डी, पुणे ४४

शाखा - अंबर प्लाझा-बी, एस.टी.स्टँड व ए.डी.सी.सी.बँकेजवळ, अहमदनगर.

www.badhemaratha.com  Email : badhe.raosaheb@gmail.com

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे व विज्ञान वाहिनी संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''फिरती विज्ञान प्रयोगशाळा बस''

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे ही संस्था १९८० पासून विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवित आहे. यापूर्वी सुद्धा फेब्रुवारी २०१९ मध्ये मंडळाने पारनेर तालुक्यातील निरनिराळ्या शाळांमध्ये ''फिरती विज्ञान प्रयोगशाळा बस''चा कार्यक्रम राबविला होता. त्यामुळे अनेक शाळांचे या कार्यक्रमासाठी निमंत्रण आले होते.



*विज्ञान प्रयोग करताना विद्यार्थी.*

म्हणून पारनेर तालुका मित्र मंडळ पुणे व विज्ञान वाहीनी संस्था पुणे यांच्या संयुक्त प्रयत्नाने **''फिरती विज्ञान प्रयोगशाळा बस''**चे १७, १८, १९ व २० सप्टेंबर, २०१९ रोजी आयोजन करण्यात आले होते. या कालावधीत अंचलेश्वर विद्यालय - गांजी भोयरे, श्री हनुमान विद्यालय - दरोडी, श्री केदारेश्वर विद्यालय - बाभूळवाडे व श्री लोणेश्वर विद्यालय - लोणी हवेली या ठिकाणी सदर उपक्रम राबविला.

सदर गावांमध्ये ही फिरती प्रयोगशाळा जाऊन इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांचे शालेय अभ्यासक्रमातील सर्व विज्ञान प्रयोग दाखविण्यात आले व विद्यार्थ्यांकडून



*विज्ञान प्रयोग करताना तल्लीन विद्यार्थी.*



*विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोग समजून सांगताना शास्त्रज्ञ.*

प्रयोगांचे प्रात्यक्षिक करुन घेण्यात आले.

या उपक्रमामध्ये पुणे येथील नामांकित तज्ञ प्राध्यापक, शास्त्रज्ञ यांनी विद्यार्थ्यांबरोबर पूर्ण दिवस शाळेत थांबून त्यांच्या अभ्यासक्रमातील विज्ञान व प्रयोग शिकविले. यामध्ये **श्री दत्तात्रय देवल, श्री विवेक एरंडे, श्री सतीश घमंडे, सौ कीर्ती बापट, सौ यशश्री वाघ** या तज्ञ मंडळीचे मार्गदर्शन लाभले.

या उपक्रमाचे संबंधीत गावातील विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी भरपूर प्रतिसाद देऊन कौतुक केले आणि परत येण्याचे आमंत्रण दिले.

पारनेर तालुका मित्र मंडळातर्फे ज्या गावांमध्ये प्रयोगशाळांच्या सुविधा अपुऱ्या आहेत अशा ठिकाणी हा उपक्रम राबविण्यात आला. अजूनही काही गावांचे मंडळाकडे आमंत्रण असून सदर कार्यक्रम पुन्हा राबविण्यात येणार आहे. याकामी मंडळाचे सचिव श्री.सुनील पोटे यांनी सर्व जबाबदारी घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

**सुनिल पोटे, सचिव पारनेर मंडळ पुणे**



*फिरती विज्ञान प्रयोगशाळा बस, सोबत प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थीनी*

# पारनेरच्या पाणीप्रश्नासाठी जेलभरोची तयारी ठेवा - अण्णा हजारे

## 'आम्ही पारनेरकर' देशाला नवी दिशा देणार !

पारनेर तालुक्यातील विविध क्षेत्रातील भूमिपुत्रांनी एकत्र येत पाणीप्रश्न व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी सुरू केलेले **आम्ही पारनेरकर सामाजिक विचारपीठ** राज्याला नव्हे तर देशाला दिशा देणारे ठरणार आहे. पारनेरच्या पाणीप्रश्नासाठी जेलभरो आंदोलनाची तयारी ठेवा. मी तुमच्यासोबत सर्वात पुढे असेल, अशी प्रेरक ग्वाही **जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे** यांनी दिली.



**राळेगणसिद्धी परिवार, आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान व पारनेर तालुका पत्रकार संघ** यांनी एकत्र येत सुरू केलेल्या आम्ही पारनेरकर सामाजिक विचारपीठच्या माध्यमातून पारनेर तालुक्याचा पाणीप्रश्न व स्पर्धा परीक्षा याविषयावर राळेगणसिद्धी येथे आयोजित मेळाव्यात **श्री. हजारे** प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

मेळाव्याची भूमिका **आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.बाळासाहेब बांडे** यांनी मांडली. स्वागत व प्रास्तविक राळेगणसिद्धी परिवाराचे सामाजिक कार्यकर्ते सुरेश पठारे यांनी केले.

अण्णा म्हणाले, सामाजिक प्रश्न सुटण्यास विलंब लागत असतोच पण त्यासाठी केलेले प्रयत्न प्रामाणिक असतील तर ते नक्की सुटतात.राजकारणविरहीत मोठे सामाजिक संघटन उभे राहावे. निवडणूक संपली की राजकीय जोडे बाजूला ठेवावे. सरकार आंदोलनाला घाबरत नाही ते पडण्याला घाबरते त्यामुळे सरकार पाडण्याची ताकद निर्माण करा. पारनेर तालुक्यातील विविध प्रश्नांचा सर्व्हे करून तो शासनाला सादर करा. शासन दरबारी आपण सर्वजण मिळून पाठपुरावा करू.

जिल्हा परिषदेचे सदस्य संदेश कार्ले, माजी उपाध्यक्ष सुजीत झावरे, माजी सदस्य विश्वनाथ कोरडे, आझाद ठुबे, माजी सभापती राहुल झावरे, गणेश शेळके, सरपंच डॉ.राजेश भनगडे, पत्रकार दादा भालेकर, कैलास लोंढे, विलास गोसावी, सतीश भालेकर, वसंत थोपटे यांनी पाणी प्रश्नावर भूमिका मांडल्या.


स्लाईड शोद्वारे विविध प्रस्तावित व पूर्ण झालेल्या प्रकल्पांची माहिती देण्यात आली. यावेळी सर्वश्री राहुल शिंदे, बाबासाहेब तरटे, बाबासाहेब तांबे,राम पठारे, पद्माकर भालेकर, शंकर नगरे, डॉ.वासुदेव साळुंके, शिवाजी व्यवहारे, सुखदेव पवार, संयोजन समितीचे डॉ.गणेश पोटे, संतोष सोनावळे, मच्छिंद्र लंके, राजेश भंडारी, दादा पठारे, सनी सोनावळे, लाभेश औटी, गणेश भोसले, सुनील हजारे, गणेश भापकर, सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब खिलारी, पारनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष देविदास आबुज, माजी अध्यक्ष मार्तंड बुचुडे, डॉ.संजय बांडे, प्रताप खिलारी, सुरेश निवडुंगे, संदीप कोरडे, संदीप खिलारी, दादा झावरे आदींसह पारनेर व नगर तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सूत्रसंचालन आम्ही पारनेरकर व आम्ही टाकळीकरचे संस्थापक, पत्रकार चाँद शेख यांनी केले.** पारनेर तालुका पत्रकार संघाचे सचिव शरद झावरे यांनी आभार मानले.

**- पत्रकार चाँद शेख**








## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
ए-६०५, ''शुभकल्याण'' नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (Cell : 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ____________________

____________________

____________________

____________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०